# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२३**
**सन २०२३-२४ च्या पुरवणी मागण्यांवरील**
**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**
**सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२३**

## नगर विकास विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ३७**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**बाब क्रमांक: ११४, रूपये:- ७,००,००,००,०००/-**<br>**श्री. विश्वजित कदम** |
| (१) | ६११२ | १० | पलूस जि.सांगली येथील पलूस नगरपरिषद क्षेत्रात मोठया प्रमाणात नागरीकरण होत असून अजूनही आगीच्या उपाययोजनेसाठी कोणतीच उपाययोजना करण्यात न येणे, त्यामुळे स्थानिकांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना,याबाबत राज्य शासनाने चौकशी करुन पलूस नगरपरिषदेचे महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान अंतर्गत प्रस्तावास मान्यता देऊन व निधी मंजूर करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | ६११६ | १० | सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यातील नगर परिषदेच्या जुन्या इमारतीमुळे प्रशासकीय कामकाज अत्यंत अडचणी येत असून स्थानिकांमध्ये असंतोष निर्माण झाला असून याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन पलूस नगरपरिषदेसाठी नूतन इमारत बांधकाम करण्यासाठी निधी मंजूर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही उपाययोजना. |
| (३) | ६१३५ | १० | सांगली जिल्हयातील पलूस-कडेगांव मतदारसंघातील पलूस नगरपरिषद ही नवनिर्मित असणे, येथील सोयीसुविधा व दळणवळणाच्या दृष्टीने शहरातील रस्त्यासाठी निधी मंजूर करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४) | ६१३६ | १० | सांगली जिल्हयातील पलूस नगरपरिषदेसाठी अंतर्गत रस्ते व गटारे इत्यादीचे कामे अर्धवट स्थितीत असल्याने शहरातील विकास कामासाठी येणाऱ्या अडचणी याबाबत चौकशी करुन अंतर्गत रस्ते व गटारे बांधकामासाठी वैशिष्ट्यपुर्ण विकास निधी योजनेतून निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. संजय जगताप** |
| (५) | ६१२८ | १० | केंद्र सरकारने जाहीर केलेल्या "स्मार्ट सिटी" पुरस्कारांमध्ये महाराष्ट्राची पिछेहाट झाली असून पिंपरी-चिंचवड, सोलापूर यांना मिळालेले दुय्यम पुरस्कार वगळता राज्यातील अन्य मोठया शहरांनी मात्र निराशा केली असल्याचे माहे डिसेंबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, या स्पर्धेतील ८ शहरातील महानगरपालिकांनी स्वच्छता व सुशोभिकरणावर मोठया प्रमाणावर खर्च केला असणे, या संदर्भात शासनाने माहिती घेवून सदरील शहर पुढील वर्षी "स्मार्ट सिटी "योजनेत अव्वल यावीत यासाठी कोणते नियोजन केले नसल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेली चिड व असंतोष लक्षात घेता शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही उपाययोजना. |
| (६) | ६१२९ | १० | मुंबई महानगरपालिकेत सध्या ४२ हजार जागा रिक्त असल्यामुळे कार्यरत कर्मचा-यांवर कामाचा ताण येत असणे, त्यामुळे शासनाने या कार्यरत कर्मचाऱ्यांना निवडणूक कामांची जबाबदारी देवू नये त्यासाठी सेवानिवृत्त झालेल्या आणि इच्छुक असलेल्या कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याची मागणी होत असणे, यासंदर्भात शासनाने माहिती व निर्णय घेवून या रिक्त जागा तातडीने भरण्यासह सदर मागणीवर कार्यवाही करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | ६१५९ | १० | ठाणे जिल्ह्यातील कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील टिटवाळा येथे महापालिकेचे बस स्थानकाचे बांधकाम दोन वर्षापासून तयार असून महानगरपालिका प्रशासनाने बस सेवा सुरु न करणे, टिटवाळा येथील शहरीकरण दिवसेदिवस वाढत असणे, व आसपासच्या परिसरातील लोकांच्या गैरसाय होत असणे, त्यामुळे तेथील रहिवासी यांच्यामध्ये शासनाप्रती असंतोषाची भावना निर्माण होण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अमित झनक** |
| (८) | ६१३० | १० | वाशिम जिल्हयातील मालेगाव नगरपंचायत निर्मिती झाल्यापासून नगरपंचायातीचे कामकाज जुने ठिकाणी सुरू असणे, नगरपंचायत दर्जा मिळुन सुध्दा सध्या कामकाजात अडचणी येत असणे, नगर पंचायतीच्या प्रशासकीय इमारत कामकाज करिता मंजूर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | ६१३१ | १० | वाशिम जिल्हयातील रिसोड येथे बालकांसाठी सर्व सोयीसुविधा असलेले उद्यान उपलब्ध नसल्यामुळे बालकांच्या खेळासाठी उद्यान उपलब्ध न होणे, यासाठी त्वरीत उपाययोजना करुन रिसोड नगरपरिषदेसाठी बालकांच्या उद्यानसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. राजेश टोपे** |
| (१०) | ६१५३ | १० | नव्याने स्थापन झाल्याले नगरपंचायत घनसावंगी व तिर्थपुरी येथे वैशीष्ट पुर्ण कामासाठी विशेष अनुदान मंजुर न झाल्यामुळे विकासाची अनेक कामे थांबलेले असणे, तरी नवीन कामे हाती घेण्यासाठी वैशीष्टपुर्ण योजनेअंतर्गत विशेष निधीची आवश्यता असणे, दोन्ही नगरपंचायतीना वैशीष्टपुर्ण योजनेअंतर्गत कामासाठी विशेष निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विकास ठाकरे** |
| (११) | ६१०८ | १० | सप्टेंबर 2023 मध्ये नागपुरात मोठया प्रमाणात पूर आला असणे, अंबाझरी तलाव जवळील अंबाझरी ले आऊट, डागा ले आऊट, कॉर्पोरेशन कॉलनी, शंकर नगर आणि जेही झोपडपट्टी नाग नदीच्या किनाऱ्यावर आहे तशीच पश्चिम नागपूर मध्ये पिली नदीच्या आणि दक्षिण-पश्चिम आणि दक्षिण नागपूर मधून वाहणारी पोरा नदी अशा तीन नदी किनारी असलेल्या घरांमध्ये आणि मोठ्या नाल्यांच्या शेजारी असलेल्या वसाहतीमध्ये पुराचे आणि गटाराचे पाणी घुसल्यामुळे नागरिकांच्या घरांचे, सामानाचे आणि वाहनांचे मोठया प्रमाणात लाखों रुपयांचे नुकसान झाले असणे, एवढे नुकसान होऊनही राज्य शासनाने फक्त १० हजार रुपयांची तुटपुंज मदत करणे, नागरिकांच्या घरांचे आणि गाड्यांचे, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॅानिक उपकरणे, कपडे, गादी, सोफा, अन्नधान्य इत्यादीच्या नुकसान झाले त्या संबधी कोणतीच मदत शासनाने केली नसणे, नागपूर महानगरपालिकेणे या नुकसानासंबधी सर्वेक्षण केले असता २३४ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे आढळून येणे आणि बाकी सर्व विभागांची नुकसानाची मिळून ५०० कोटी रुपयांची शासना कडे मागणी करण्यात येणे, महानगरपालिका आणि बाकी विभागांच्या सर्वेक्षणाच्या आधारावर होती परंतु सरकारने फक्त ८ कोटी रुपयांची तुटपुंजी मदत देण्यात येणे, परिणामी स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, १ हजार कोटीचे विशेष निधीची तरतूद करण्याबाबत करावयाची कार्यवाही, पुरामागील कारणे शोधण्याची गरज आहे आणि याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन भविष्यात अशा दुर्घटनेवर अळा बसण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **अ‍ॅड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (१२) | ६१७४ | १० | अमरावती जिल्हयातील नव्याने स्थापन झालेल्या नगरपंचायत करीता वैशिष्ठपूर्ण योजने अंतर्गत वारंवार निधीची मागणी होणे, परंतु अद्यापही निधी उपलब्ध न झाल्यामुळे तिवसा नगरपंचायत अंतर्गत रस्त्यांची कामे प्रलंबीत असेण, त्यामुळे नागरिकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण होणे, तिवसा नगरपंचायत करीता वैशिष्ठपूर्ण योजने अंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१३) | ६१७९ | १० | तिवसा नगरपंचायतची लोकसंख्या १५ हजाराच्या वर असून नागरीकांना पुरेसा पाणीपुरवठा होत नसून नागरीकांना ३ ते ४ दिवसांनी पाणी मिळते व दरवर्षी उन्हाळयात पाण्याची तिव्र टंचाई निर्माण होणे, याकरीता तिवसा नगरपंचायतने नगरोत्थान योजनेअंतर्गत प्रस्ताव किंमत रु. २६.६८ कोटी रुपयांचा शासनास सादर केलेला असणे, परंतु अद्यापही शासनस्तरावर मान्यता मिळालेली नसणे, तिवसा नगरपंचायतची वाढीव लोकसंख्या लक्षात घेता याकरीता तिवसा वाढीव पाणीपुरवठा योजनेला तात्काळ मंजुरी मिळण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संग्राम थोपटे** |
| (१४) | ६१२६ | १० | पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील भोर नगर परिषद अंतर्गत विशेष रस्ता अनुदान अंतर्गत रु. ३.५० कोटी वैशिष्ट्येपुर्ण योजनेअंतर्गत रक्कम रूपये १.५० कोटीची कामे मंजुर असुन जवळपास ९५ टक्के कामे पुर्ण झालेली असणे, मात्र या कामासाठी एक रूपयाचा निधी वितरीत झालेला नसणे, त्यामुळे पुढील कामे करण्यास मर्यादा येत असल्याने भोर येथील रस्त्याचा विकास होण्यात येणाऱ्या अडचणी, याबाबत राज्य शासनाने चौकशी करुन याकामी स्वतंत्र निधी वितरण करण्याचे आदेश देण्याबाबत शसानाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अमिन पटेल** |
| (१५) | ६१५४ | १० | मुंबईमध्ये अनेक विभागात नविन उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाले असणे, काही ठिकाणी अजूनही ही कामे पूर्ण झालेली नसणे, या उड्डाणपुलाच्या खाली असणा-या मोकळया जागेत होणारे अतिक्रमसण थांबवून या जागेचा वापर सुशोभिकरणासाठी करण्याची आवश्यकता, जेणेकरुन या जागेवर गदुर्ले, भिकारी किंवा इतर समाजकंटक अतिक्रमण करणार नाही, या उड्डाणपुला खालील मोकळया जागेचे सुशोभिकरण करण्याबाबत तसेच लोकोपयोगी उपक्रम सुरु करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१६) | ६१५८ | १० | मुंबईमध्ये अनेक ठिकाणी झोपडया उभारल्या जात असून शासकीय, निमशासकीय, किंवा वन विभागाच्या जागेवर अतिक्रमण केले जात असणे, अश्याप्रकारे झोपडया उभया करुन वस्त्या बसविण्याचे काम भुमाफिया करीत असणे, अश्या झोपडयांमध्ये काही वेळी दुर्घटना घडून जीवितहानी होत असणे, या भुमाफियांवर कठोर कारवाई करुन अतिक्रमण रोखण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (१७) | ६१६० | १० | भंडारा जिल्ह्यात साकोली नगर परिषदेला स्वतंत्र प्रशासकीय ईमारत नसणे, नगरपरिषद साकोली व नगरपंचायत लाखनी व लाखांदूर शहरातील कव्हरसहीत गटाऱ्यांचे बांधकाम नसणे, शहरात स्वतंत्र पाणी पुरवठा योजना नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. बळवंत वानखडे** |
| (१८) | ६११७ | १० | दर्यापूर विधानसभा मतदार संघातील दर्यापुर व अंजनगाव सुर्जी या नगरपरिषदांना नगरविकास विभागाच्या विविध योजनेअंतर्गत विकासकामांना १) शासन निर्णय क्र. रस्ताअ- २०२२/प्र.क्र. २८ (१२) नवि-१६ दिनांक २५ मार्च २०२२ , २) शासन निर्णय क्र. रस्ताअ- २०२२/प्र.क्र. २८ (१३) नवि-१६ दिनांक २५ मार्च २०२२ ,३) शासन निर्णय क्र. नपावै २०२२/प्र.क्र. ९८ (०९) नवि-१६ दिनांक १० जून २०२२, ४) शासन निर्णय क्र. रस्ताअ- २०२२/प्र.क्र. ९८ ब (०९) नवि-१६ दिनांक १० जून २०२२, ५) शासन निर्णय क्र. रस्ताअ- २०२२/प्र.क्र. ९८ ब (०९अ) नवि-१६ दिनांक १० जून २०२२ ,६) शासन शुध्दीपत्रक क्र. रस्ताअ- २०२२/प्र.क्र. २८ (१२) नवि-१६ दिनांक १० जुन २०२२ च्या शासन निर्णयानुसार निधी वितरणासह प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली असणे , मा. उच्च न्यायालय , मुंबई मार्फत सदर कामांवरील स्थगिती उठवण्याबाबत राज्य शासनाला आदेशीत केलेले असणे, मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या २९/०९/ २०२३ च्या पत्रकाद्वारे उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये स्थगिती सरसकटपणे उठवीत असल्याचे सूचना दिलेल्या असणे, परंतु नगरविकास विभागामार्फत अद्यापही याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, सदर कामे मार्च २०२४ पर्यन्त पूर्ण करावयाची असणे , नगरविकास विभागामार्फत स्थगिती उठवलेल्या कामाची प्रक्रिया पूर्ण करणेबाबत तातडीने आदेश निर्गमीत करण्याची नितांत आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१९) | ६११८ | १० | नगर परिषद दर्यापूर जि. अमरावती येथील शासन अधिसूचनेनुसार शासन निर्णय क्रमांक एम.यु.एन. २०१७/प्र.क्र. १७७/नवी-१८ दिनांक २१ जून २०२१ नुसार हद्दवाढ झालेली असणे , यात प्रामुख्याने दर्यापूर शहरालगत असलेल्या , गायवाडी ,पेठ जहानपूर , पेठ इतबारपूर , लोधीपुर , गणेशपूर , शिवर , लेहेंगाव या ग्रामपंचायतीच्या बहुतांश भाग नगर परिषद दर्यापूर मध्ये समाविष्ट झालेला असणे , पूर्वी ग्रामपंचायतीमध्ये असलेला ,साईनगर ,सैनिक कॉलनी, ,समता नगर,मेहर नगर,अवधुत नगर, ड्रिम लॅड सिटी, पंजाबराव कॉलनी , संत गाडगेबाबा शिक्षक कॉलनी व अन्य परिसरात मोठ्या प्रमाणात मूलभूत सुविधांचा अभाव असणे , पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात या भागात सांडपानी वितरणाची व्यवस्था नसल्याने पावसाचे पाणी तसेच सांडपाणी मोठ्या प्रमाणात साचलेले असणे . यामुळे सरपटणाऱ्या प्राण्यांचा धोखा निर्माण झालेला असणे , तसेच रोगराई पसरण्याची शक्यता निर्माण झालेली असणे , या भागातील नागरिकांमार्फत वेळोवेळी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणेबाबत मागण्या करण्यात येणे तसेच वेळोवेळी आंदोलन करण्यात येणे , हद्दवाढ झालेल्या भागात मूलभूत सुविधा पुरवण्याबाबत २५ कोटी निधी उपलब्ध करून देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी मार्फ़त मा. मंत्री नगरविकास यांना लेखी पत्रव्यहार केलेला असणे , परंतु अद्यापही याबाबत |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसणे , यामुळे या भागातील नागरीकांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (२०) | ६१०१ | १० | मालवणी मालाड(पश्चिम),मुंबई येथील महानगरपालिकेच्या मलनि:स्सारण सांडपाणी प्रक्रिया केंद्र असून सदरचे केंद्र सन १९९८ पासून २४० द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेने प्राथमिक मलजल प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला असणे, सन १९९९ ते २०२२ या कालावधीत मुंबईतील भविष्यातील मलनि:स्सारण व्यवस्थेचा सुसाध्यता अभ्यास करण्यासाठी महानगरपालिकेने सांडपाणी प्रकल्पा संदर्भात मे.मॉट मॅकडोनाल्ड कंन्सेर्शियम या सल्लागार कंपनीची नियुक्ती केली असणे, मे. मॉट मॅकडोनाल्ड कंन्सेर्शियम या सल्लागार कंपनीने अभ्यास करुन बृहन्मुंबई मलनि:स्सारण प्रकल्प टप्पा-२ चा मास्टर प्लॉन तयार करण्यात आला असणे, त्यानुसार सन २६३ सी.टी.एस, क्र. २८४१ (पै) येथील ३५ हेक्टर जागेवर ४५४ द.ल.प्रतिदिन क्षमतेने अद्यावत द्वितीय/तृतीय स्तरीय प्रक्रिया केंद्र उभारण्याकरिता मलजल प्रक्रिया केंद्र प्रस्तावित करण्यात आले असणे, सदरची जमीन सागरी नियंत्रण क्षेत्राने बाधित असणे, पर्यावरण, वने आणि वातावरणीय बदल या मंत्रालयाची दि. २२.०८.२०१९ रोजी परवानगी दिली असणे, तसेच दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ सागरी नियंत्रण (सी.आर झेड-१) क्षेत्राची परवानगी प्राप्त झाली असणे, सर्व विभागाच्या परवानग्या मिळाल्या असणे, तथापि टप्प २ चे काम अद्याप सुरु झाले असणे, म.न.पा ने निविदेमध्ये अनेक वेळा पडताळणी करुन आवश्यकत ते फेरबदल केले, मा. राष्ट्रीय हरीत लवादाच्या सुधारित विसर्ग मानांकनानुसार पुन्हा दिनांक १८/२/२०२२ रोजी चौथ्यांदा निविदा मागविण्यात आल्या असणे, निविदेचे काम पुर्ण झाले असणे, मलनि:स्सारण सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प टप्पा-२ चे काम तातडीने सुरु करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक रहिवाशात निर्माण झालेला तीव्र असंतोष व शासनाप्रती निर्माण झालेली चिडीची भावना याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| (२१) | ६१०२ | १० | मढ दर्यादिप मच्छिमार सहकारी सोसायटी, मढ कोळीवाडा, मालाड (पश्चिम) मुंबई या संस्थेने मच्छिमारांसाठी समाज मंदिर बांधून देण्याची मागणी केली असणे, तथापि समाज मंदिर बांधून दिले नसणे, समाज मंदिर बांधून देण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, पिण्याच्या पाण्याची योजना राबविणे, याकडे बृहन्मुंबई महानगरपालिकेने व शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक नागरिकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (२२) | ६१०५ | १० | अंबोजवाडी, मालवणी, मालाड (पश्चिम) मुंबई येथील जमीनीचा सर्व्हे क्र. २६३ (भाग) सीटीएस ३५५४(भाग) या जागेवर शासनाने स्मशानभूमी व दफनभूमीचे सर्व धर्मीयासाठी आरक्षण ठेवले असणे, मात्र सदरच्या स्मशानभूमीचे व दफनभूमीचे काम सुरु झाले नसणे, मालाड येथे अनेक स्मशानभूमी असणे, मालाड येथील लोकसंख्या मोठया प्रमाणावर वाढली असणे, लोकसंख्याच्या प्रमाणात स्मशानभूमी व दफनभूमी कमी पडत असल्याचे जाणवत असणे, त्यामुळे अंबोजवाडी येथील स्मशानभूमी व दफनभूमी सर्व धर्मीयांसाठी तातडीने बांधण्याची व सुरु करण्याची आवश्यकता असणे याकडे शासनाने व म ना पा ने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक रहवाशांत निर्माण झालेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२३) | ६११० | १० | मौजे मनोरी गाव तालुका बोरिवली मालाड पश्चिम मुंबई (पी उत्तर विभाग) येथे मुस्लिम व हिंदू स्मशानभूमीची आवश्यकता असून सदरच्या स्मशानभूमीसाठी महसूल व वन विभाग यांच्या दिनांक 11.08.1987 रोजीच्या शासन ज्ञापन अन्वये मौजे मनोरी तालुका बोरिवली येथील सर्वे नंबर 290 मधील 20 गुंठे जमीन मुस्लिम दफनभूमीसाठी व सर्वे नंबर 294 मधील 15 गुंठे जमीन हिंदू स्मशानभूमीसाठी मंजूर करण्यात आले असणे, दोन्ही स्मशानभूमीच्या जागेचा ताबा महानगरपालिकेनेदिनांक 8.04.1999 रोजी घेतला असणे तसेच त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी दिनांक 31.08.1987 रोजी स्मशानभूमी बांधण्याचे आदेश निर्गमित केले असणे, तथापि शासनाच्या व मनपाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष व निष्काळजी केल्यामुळे स्मशानभूमी झाली नसणे, संबंधित अधिकाऱ्यांवर कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी कठोरात कठोर कारवाई करणे स्थानिक लोकप्रतिनिधींनी व ग्रामस्थांनी स्मशानभूमीच्या जागेची वारंवार मागणी केली असणे, सदरच्या जागेवर ओम विकासकांनी हिंदू स्मशानभूमीच्या जागेवर भिंत बांधून अतिक्रमण केले असल्याचे निदर्शनास आल्याने ओम विकासकामे केलेले अतिक्रमण हटविणे व शासनाने ओम विकासकावर कठोर कार्यवाही करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, मनोरी गाव तालुका बोरिवली मालाड पश्चिम मुंबई (पी/ उत्तर विभाग) येथे मुस्लिम दफनभूमी व हिंदू स्मशानभूमी बांधण्यासाठी शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक रहिवाशांत निर्माण झालेला तीव्र असंतोष स्मशानभूमी बांधण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२४) | ६१२३ | १० | मुंबई मालाड पश्चिम, मालवणी, चारकोप नाला येथील चारकोप नाल्यातील गाळ पूर्ण काढलेला नसणे, चारकोप नाला ते रियान इंटरनॅशनल स्कूल पर्यतच्या नाल्यातील गाळ म.न.पा कडून प्रत्येक वर्षी काढण्यात येत असणे, मात्र गाळ पूर्ण काढला जात नसणे, त्याच प्रमाणे रियान इंटरनॅशनल स्कूल ते महानगर पालिकेचे मालाड मलनि:सारण सांडपाणी प्रक्रिया केंद्रापर्यत वर्षानुवर्षे गाळ काढला जात असणे, गाळ न काढल्यामुळे त्याठिकाणी मोठया प्रमाणावर नाल्यात गाळ साचला |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | जात असणे, त्यामुळे दुर्गंधी निर्माण झाली असणे, परिणाम स्वरुप पर्यावरण व स्थानिक नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असणे, फुफुसांचे आजार होत असणे, खोकला व साथीच्या रोगांचे आजार होत असणे, याकडे म.न.पा चे संबंधित अधिकारी म.न.पा स गाळ काढल्याचे दाखवत असणे, मात्र प्रत्यक्षात गाळ काढला जात नसणे, संबंधित अधिका-यांची विभागीय चौकशी करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, संबधित अधिका-यांवर कामात कुचराई व दिरंगाई केल्या प्रकरणी कठोर कारवाई करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याकडे शासनाने व म.न.पा ने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक रहिवाश्यांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, शासनाप्रती निर्माण झालेली चिडीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**बाब क्रमांक: ११५, रूपये:- १,००,००,००,०००/-**<br>**श्री. सुनिल प्रभू** |
| (२५) | ६१६२ | १० | मुंबईतील वडाळा विभागात दोस्ती एकर येथे मुंबई महापालिकेने सुपुर्द केलेल्या भूखंडावर नाना शंकरशेठ यांचे स्मारक करण्याचे प्रस्तावीत केले असून सदर स्मारकासाठी २५ कोटी रुपये निधीची आवश्यकता असणे, स्मारकांविषयी आराखडा तयार असणे, सदर भूखंडावर नाना शंकरशेठ यांच्या स्मारक उभारणीसाठी आवश्यक असलेल्या निधीची तरतुद करुन सदरहू स्मारकाचे काम तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**बाब क्रमांक: ११८, रूपये:- १,००,००,०००/-**<br>**श्री. राजेश एकडे** |
| (२६) | ६१५२ | १० | मलकापूर विधानसभा मतदारसंघातील मलकापूर शहर व नांदुरा शहर ही 'ब' वर्ग नगरपालिका असणे, नांदुरा व मलकापूर शहराचे दिवसेंदिवस शहरीकरण वाढत असणे, दोन्ही शहरांमध्ये वारंवार पाणीपुरवठा वितरण च्या तक्रारी वाढत असणे, पाणीपुरवठा वितरण वाहकीची गळती होत असणे , सदर वितरण नलिका ह्या 50 ते 46 वर्ष जुनी असणे,त्यावेळेस ची लोकसंख्या व आज रोजी ची लोकसंख्या प्रचंड प्रमाणात वाढ झालेली असणे, त्यामुळे वितरण नलिका अद्यावत करून लोकांना पाणीपुरवठा वेळेवर करणे, आवश्यक आहे त्याकरता नगर परिषद ने दोन्ही नगरपालिकेने प्रस्ताव तयार केला असून सदर प्रस्ताव तांत्रिक मान्यता मिळण्यासाठी मुख्य अभियंता माजीप्र अमरावती यांच्याकडे सादर केलेला प्रलंबित असणे, या योजनेसाठी नांदुरा करीत अंदाजे 93.91 कोटी रुपयांची रुपये निधीची तसेच मलकापूर नगरपालिका करिता 79.32 कोटी रुपयांची आवश्यकता असून |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | सदर पाणीपुरवठा योजने करता महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाचीकार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बळवंत वानखडे** |
| (२७) | ६१२२ | १० | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत न.प. दर्यापूर येथील विस्तारीत पाणीपुरवठा योजनेचे काम निधीअभावी रखडले असणे , सदर कामास उर्वरित ६४ लक्ष रुपये निधी उपलब्ध करून देण्याबाबत जिल्हा प्रशासनामार्फत शासनास प्रस्ताव सादर केलेला असणे , परंतु अद्यापही निधी उपलब्ध झालेला नसणे , यामुळे सदर योजनेचे रखडलेले काम पूर्ण करण्यात अडथळा निर्माण होत असणे , सदर कामावर निधी उपलब्ध करून देण्याची नितांत आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पूल**<br>**बाब क्रमांक: १२०, रूपये:- १,००,००,००,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (२८) | ६११३ | १० | मुंबई उपनगरातील मालाड पश्चिमेतील मार्वे रोड हा रस्ता मुंबई शहरातील मुख्य रस्त्यांपैकी मार्वे रोड हा एक महत्त्वाचा रस्ता असून या रस्त्यावर मढ आयर्लंड मार्वे समुद्रकिनारा मढ बीच आक्सा चौपाटी मढ हवाई दलाचे केंद्र भारतीय नौसेनेचा हमला एस्सेल वर्ल्डला जाण्यासाठी महत्त्वाचा रस्ता असणे त्याचप्रमाणे पर्यटकांचे महत्त्वाचे ठिकाण असून रस्ता तातडीने रुंदीकरणाचे काम मंद गतीने सुरू असणे रस्ता रुंदीकरणात शासनास आलेल्या अपयश परिणाम स्वरूप रस्त्यावर निर्माण झालेली वाहतूक कोंडी लिंक रोड व मीठ चौकी येथे प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण होत असणे त्याचप्रमाणे माड ते मार्ग ती संख्या दरम्यानच्या मार्वे रोडच्या रुंदीकरणाचे काम गेल्या 25 वर्षांपासून अपूर्ण अवस्थेत असणे याकडे पी/उत्तर विभागाचे सहाय्यक आयुक्त दुर्लक्ष करीत असणे परिणाम स्वरूप टी जंक्शन दरम्यान दररोज प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण होणे ज्या ठिकाणी वाहनाने जाण्यासाठी दहा मिनिटे लागतात त्या ठिकाणी वाहतूक कोंडीमुळे एक तास लागत असते त्यामुळे वायू व ध्वनी प्रदूषण निर्माण होत असते त्याचा स्थानिक रहिवाशांच्या आरोग्यावर परिणाम होणे वाहतूक कुंडीकडे परिवहन विभागाचे अधिकारी दुर्लक्ष करीत असणे पालिका उत्तर विभागाचे सहाय्यक आयुक्त व कार्यकारी अभियंता मार्वे रोडच्या रुंदी करण्याच्या कामाकडे लक्ष देत नसणे अधिकारी बे जबाबदारीने वागत असणे पालिकेचे अधिकारी अकार्यक्षम असणे उपरोक्त बाबी संदर्भात पी/उत्तर विभागाच्या सहायक आयुक्तावर जबाबदारी निश्चित करणे व मार्ग रोडचे रुंदीकरणाचे काम त्वरित पूर्ण करणे या कडे संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत असणे परिणामी जनतेत निर्माण झालेला तेव्हा असंतोष व शासनाप्रती निर्माण झालेली चिडीजी भावना वाहतूक कोंडी दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (२९) | ६११९ | १० | मुंबई उपनगरातील मालाड पश्चिम येथे मढ ते वर्सोवा पूल व मारवे रोड ते मनोरी पूल बांधण्याची गरज असणे तथापि शासनाने त्याकडे दुर्लक्ष करीत असणे, त्यामुळे पूला अभावी स्थानिक नागरिकांची गैरसोय होत असणे, तातडीने पूल बांधण्याची आवश्यकता भासत असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक नागरिकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३०) | ६१२० | १० | मुंबई उपनगरातील मालाड पश्चिम येथे मार्वे रोड वर धारवली गाव येथे पूल बांधणे आवश्यक असणे, धारवली पूला अभावी स्थानिक नागरिकांची गैरसोय होत असणे धारवली गाव येथे तातडीने पूल बांधण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधीनी संबंधितांकडे वारंवार मागणी केली असणे मात्र मनपाचे अधिकारी त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष करीत असणे परिणामी स्थानिक रहिवाशांत निर्माण झालेल्या तीव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३६०४, स्थानिक संस्था व पंचायतराज संस्था यांना नुकसानभरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे**<br>**बाब क्रमांक: १२५, रूपये:- २,००,००,००,०००/-**<br>**श्री. पृथ्वीराज चव्हाण** |
| (३१) | ६१७७ | १० | राज्यात एकूण २४१ नगरपरिषदा व १४४ नगरपंचायती अशा एकूण ३८५ नगरपरिषदा/ नगरपंचायती असणे, राज्यातील २४ महानगरपालिकांना १% मुद्रांक अधिभार, रु. ७९१ कोटी इतके अनुदान वितरित केले असणे, परंतु राज्यातील नगरपरिषदा/ नगरपंचायती यांचे मुद्रांक शुल्क सहाय्यक अनुदान सुमारे रु. ५७७ कोटी इतके २०१८-१९ पासून रखडलेले असणे, हिवाळी अधिवेशनाच्या पुरवणी मागण्यामध्ये थकीत मुद्रांक शुल्क साठी रु. २०० कोटी इतकी तरतूद केली असणे, पावसाळी अधिवेशनामध्ये मा. मुख्यमंत्री महोदय यांनी संपूर्ण रक्कम थकीत मुद्रांक शुल्क त्वरित दिले जातील अशी घोषणा केली असताना अजूनही त्यावर अंमलबजावणी झालेली नसणे, या अनुषंगाने नगरपरिषदा/नगरपंचायतींना उर्वरित थकीत मुद्रांक शुल्क अनुदान तात्काळ देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२१७, नगरविकासावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १२८, रूपये:- २०,००,००,००,०००/-**<br>**श्री. राजेश एकडे** |
| (३२) | ६१४२ | १० | बुलढाणा जिल्ह्यातील नगरपरिषद नांदुरा ची हद्दवाढ सन २०१६ मध्ये झालेली असने, नगरपरिषदेच्या हद्दवाढ झालेल्या भागात अद्यापर्यंत पाणी,रस्ते, नाली बांधकाम, आरोग्य सुविधा व अनुषंगिक विकास कामे झालेली नसणे, सन २०१६ |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | पासून नगरपरिषद नांदुरे यांनी हद्दवाढ झालेल्या भागाचा विकास करण्यासाठी नगर विकास विभागाकडे प्रस्ताव सादर केलेला असणे, परंतु अद्याप देखील सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने निधी प्राप्त झालेला नसणे, नांदुरा नगरपरिषद च्या हद्दवाढ झालेल्या भागाचा विकास कामाकरिता 25 कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. सुनिल प्रभू** |
| (३३) | ६१६७ | १० | मुंबईतील मालाड (पूर्व), मौजे मालाड न.भू.क्र.८२७-ड/४ हा भूखंड विकास नियोजन आराखडा - २०३४ अन्वये महानगरपालिका प्रसुतीगृहाकरिता राखीव असलेला २७४९ चौ.मी. क्षेत्रफळाच्या महानगरपालिकेच्या पी-उत्तर विभागास हस्तांतरीत केलेल्या भूखंडावर अद्याप प्रसुतीगृह तसेच एनआयसीयु उभारण्याबाबत शासन तथा महापालिकेकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याची बाब नुकतीच निदर्शनास येणे, उक्त महापालिकेच्या राखीव असलेल्या भूखंडावर ७५ खाटांचे प्रसुतीगृह एनआयसीयु उभारण्याकरिता व्यवहार्यबाबतचा (फिजीबल रिपोर्ट) अहवाल, निधी उपलब्ध करणे, अंदाजपत्रक निविदा करणे आदि बाब महापालिकेच्या वास्तुशास्त्रज्ञ व प्रमुख अभियंता तसेच आरोग्य पायाभूत सुविधा कक्ष या विभागाच्या संबंधित अधिकारी अभियंता यांनीअद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्याने सदरहू विकासकाम प्रदिर्घ काळापासून प्रलंबित राहणे, यामुळे मालाड (पूर्व) परिसरातील स्थानिक जनतेची रुग्णालयाकडून मिळणाऱ्या औषधोपचार सेवापासून वंचित रहावे लागून रुग्णालयासाठी त्यांची होत असलेली प्रचंड गैरसोय, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.नगरविकास मंत्री, आयुक्त - महानगरपालिका यांचेबरोबर सातत्याने पत्रव्यवहार, बैठका व पाठपुरावा करुनही अद्याप याबाबत शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३४) | ६१७५ | १० | “मुंबई, मालाड (पूर्व), दिंडोशी विधानसभा क्षेत्रात अनेक ठिकाणी डोंगराळ भाग असून पावसाळ्यात दरडी कोसळण्याच्या होत असलेल्या दुर्घटना थांबविण्यासाठी अस्तित्वात असलेल्या संरक्षक भिंतीचे दरवर्षी नुकसान होत असल्यामुळे सदरहू संरक्षक भिंतीच्या कामाकरिता निधी उपलब्ध करुन देणेबाबत शासनाकडे अनेक वेळा स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी करुनही अद्याप निधी उपलब्ध करुन दिला नसल्याची बाब नुकतीच निदर्शनास येणे, राज्य शासनाच्या जिल्हा नियोजन अधिकारी यांचेतर्फे संरक्षक भिंतीच्या कामासाठी सन २०२२-२३ या वर्षात २५ प्रशासकीय कामांसाठी ६१५ लक्ष निधी मंजूर करण्यात येऊनही प्रत्येक्षात संरक्षक भिंतीच्या बांधकामासाठी एक पैसाही निधी उपलब्ध करुन देण्यात न येणे, संरक्षक भिंतीच्या बांधकामासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन न दिल्यामुळे सदरहू नादुरुस्त संरक्षक भिंतीवर दरड कोसळून जिवीत व वित्त हानी होण्याचा निर्माण झालेला गंभीर धोका, यासंदर्भात नगर विकास मंत्री महोदय, मुंबई महानगरपालिकाचे आयुक्त यांना अनेक वेळा लेखी निवेदन देऊनही अद्याप यावर |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष,परिणामी येथील स्थानिक जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” |
| | | | **श्री. रविंद्र वायकर** |
| (३५) | ६१०९ | १० | अंधेरी के/पूर्व आणि के/पश्चिम जोगेश्वरी पूर्व आणि पश्चिम या भागातील वेरावली-१ आणि वेरावली-२ येथील जलाशयामधून नागरिकांना होत असलेला पाणीपुरवठा, सदरहू दोन्ही जलाश गेल्या ४० ते ५० वर्षे जुने असून त्यांची क्षमता १६ एम जी इतकीच असणे, या विभागात २४ तास पाणीपुरवठा करण्याचे नियोजन महापालिकेचे असणे,सदर प्रकल्प यशस्वी झाल्यास अंधेरी,विलेपार्ले, जोगेश्वरी परिसरात २४ तास पाणी पुरवठा करणे शक्य होणार असणे, याकरिता पूर्व परिसरात नविन एक जलाशय निर्मिती करण्याची आवश्यकता, त्याकरिता महानगरपालिकेने डिसेंबर,२०१९ रोजी पारित केलेला ठराव, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांना दिनांक ३० जाने,२०२३, दिनांक ९ फेब्रुवारी,२०२३ रोजी केलेला पत्रव्यवहार, त्या अनुषगांने कार्यवाही करण्यास होत असलेली टाळाटाळ, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३६) | ६११४ | १० | जोगेश्वरी पूर्व येथील मुंबई महानगरपालिकेच्या नवलकर मंडईचे पुनर्विकास करण्याबाबत लोकप्रतिनिधिंकडून सातत्याने होत असलेली मागणी, जोगेश्वरी (पूर्व ) रेल्वे स्थानकाजवळ असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नवलकर मंडईतील शेड्स सन २०१५ साली धोकादायक घोषित करणे, धोकादायक असल्याने महानगरपालिकेच्या तांत्रिक सल्लागार समितीने खाली करण्याचा दिलेला अभिप्राय, त्यानुसार मंडईतील अनुज्ञापत्रधारकांना स्थलांतरित होण्याकरिता देण्यात आलेल्या नोटिसा, परंतु अनुज्ञापत्रधारकांनी पर्यायी जागेवर स्थलांतरित होण्यास दर्शविलेला तीव्र विरोध, दरम्यानच्या कालावधीत मंडईतील धोकादायक शेडचा भाग मनपा प्रशासनाकडून काढून टाकणे, मंडईचे तात्पुरते स्थलांतर म्हणून त्याच जागी संक्रमण शिबिराचे नव्याने तयार करण्यात आलेल्या आराखडयानुसार प्रस्तावित करणे,सुधारित आराखडा तयार करण्यास सहा वर्षाहून अधिकचा काळ लोटणे, किरकोळ मंडईकरिता आरक्षित असलेल्या नगर भूमापन क्र. २५५,२५६,२५७,२५८ व २५९ पैकी २५६ ,२५७ हे भूखंड अधिग्रहणासाठी सन २०१२ पासून अधिक्षक भूमिलेख यांच्याशी केलेला पत्रव्यवहार, मुंबई महानगरपालिकेच्या ७/१२ वर सदर जागेच्या नावाचा उल्लेख नसणे, त्यामुळे मंडईच्या पुनर्विकास कामास होत असलेला विलंब, नविन इमारतीचे आराखडे अदयाप मंजूर न होणे, यासंदर्भात तत्कालिन महसूल व नगरविकास मंत्रीमहोदयांसमवेत झालेल्या बैठका, तसेच प्रेमनगर मार्केटचाही पुनर्विकास रखडलेला असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (३७) | ६१४१ | १० | जोगेश्वरी-पूर्व विधानसभा कार्यक्षेत्रातील राजेश्वर रागिनवार स्मशानभूमीची जागा मनपाने ताब्यात घेऊन विकसित करून येथे वास्तव्यास असलेल्या ४२ कुटुंबियांचे पुनर्वसन करुन स्मशानभुमी अदयावत,सौदर्यीकरण आदि करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी मा.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा वांद्रे यांच्याकडे दिनांक ७ फेब्रुवारी,२०२३ रोजी व तदपुर्वी अनेक वेळा केलेला पत्रव्यवहार, सदर पत्राच्या अनुषंगाने शासन स्तरावरुन कोणतीच कार्यवाही न होणे, सदर बाब अनेक वर्षापासून प्रलंबित असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने तातडीने लक्ष घालून राजेश्वर रागिनवार स्मशानभूमी येथे वास्तव्यास असलेल्या ४२ कुटुंबियांचे पुनर्वसन, स्मशानभूमीचे विस्तारीकरण, अदयावत सौदर्यीकरण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**नागपूर,**
**दिनांक : ८ डिसेंबर, २०२३**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) नगर विकास विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर